Vol-13 Special Issue- 1.2 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाचा शैक्षणिक विकास आणि त्यांची व्यावसायिक, सामाजिक व आर्थिक परिस्थिती: एक अवलोकन

**डॉ.रामटेके वनिता देवदास**
मार्गदर्शक
शासकीय अध्यापक महाविद्यालय,(IASE),छत्रपती संभाजीनगर

**पांचाळ नागोराव गजानन**
संशोधक
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

## प्रस्तावना

बारा बलुतेदारामध्ये सर्वात महत्वाचा घटक म्हणजे सुतार समाज होय. पूर्वापार परंपरेपासून ज्या गावात सुतार समाजाची घर नसेल तर त्याला त्याला गाव म्हंटले जात नसे. त्याला वाडी किंवा वस्ती असे म्हणत. या देशात प्रत्येक गावात एक तरी सुताराचे घर असते. सुतार म्हंटले कि आपल्या समोर चित्र उभे राहते ते फर्निचर अथवा लाकडी कोरीव काम अथवा गावातल्या शेतीसाठी लागणारी लाकडाची अवजारे तयार करणारा कारागिर वर्ग. सुतार समाजात आहेर सुतार, पांचाल सुतार, लिंगायत सुतार अश्या काही पोटजाती आहेत. सुतार समाजाचा समावेश प्रामुख्याने इतर मागास वर्ग (ओबीसी) प्रवर्गात केला जातो. अगदी वैदिक काळापासून ते आजपर्यंत सुतार व्यवसाय चालू असलेला दिसून येतो. या व्यवसायाला काळानरूप चढउतार आले. स्वातंत्र्यापूर्वी व नंतर सुतार व्यवसायाला भारतीय समाजात अनन्य साधारण महत्व होते. समाजात बलुतेदारी पद्धती अस्तित्वात होती. शेतीसाठी लागणारे सर्व अवजारे उदा. वखर, तिफन, बैलगाडी, कोळप, चाडे नळे, जूइ. सुतार बनवीत असत. शेतकऱ्यानी दिलेल्या बलुत्यावर सुतारांचा उदरनिर्वाह चालत असे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती होवून शेतीसाठी लागणारी अवजारे आधुनिक तंत्रावर आधारित बनण्यास सुरुवात झाली. परिणामता: शेतकरी वर्गाने यांचा वापर सुरु केला. त्यामुळे सुतारांचा गावकीचा व्यवसाय बंद पडत गेला. पुढे या कामाचे स्वरूप बदलत गेले घरांची लाकडी दरवाजे, दारे, खिडक्याया वस्तू बनवून सुतार समाज आपला संसार चालवीत होता. कालांतराने लाकडी वस्तू ऐवजी लोखंडी, अल्युमिनिअम, प्लास्टिक सारख्या उत्पादनातूनया वस्तू तयार होवू लागल्या. किंमत कमी व आकर्षकता यामुळे समाजाने त्यांचा वापर सुरु केला. आतामात्र सुतार व्यवसाय पूर्णता: नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. सध्या प्लायवूड फर्निचरचे काम चालत आहे परंतु या कामात प्रांतीय कारागीर सहभागी झाल्याने स्थानिक सुतारांना त्यांची स्पर्धा करणेकठीण आहे. त्यामुळे आज एकेकाळी वैभवाच्या शिखरावर पोहचलेला सुतार व्यवसाय संपुष्टात येतो कि काय अशी अवस्था निर्माण झाली आहे. कामा अभावी सुतार समाज ग्रामीण भागातून स्थलांतर होवून श्री भागात जावून जमेल ते काम करून पोट भरत आहे. एकंदरीत परिस्थिती पाहता समाज व व्यवसाय या दोघांचेही स्थलांतर झाले आहे. एकेकाळी सुतार व्यवसायात मग्न असणारा समाज शिक्षणापासून दूर राहिला होता. शिक्षणाची गरज त्यांना वाटत नव्हती. परंतु बदलत्या परिस्थितीने सुतार समाजाला जाग केल. व्यवसायाची सध्यस्थिती पाहता आज शिक्षण हि बाब आवश्यक आहे याची जाणीव समाजालाहोत असल्याचेदिसून

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

येते.याचाच परिणाम म्हणून आज सुतार समाजाने शिक्षणाची कस धरायला सुरुवात केली आहे. मागील काही दशकापासून शासनाने शिक्षणाचा प्रचार व प्रसार सर्वासाठी व्हावा म्हणून अनेक प्रयत्न केले आहेत. त्यामध्ये सर्व शिक्षा अभियान असेल किंवा शिक्षणाच्या हक्काचा कायदा असेल यातून सुतार समाजाच्या दारापर्यंत शिक्षण पोहचण्यास मदत झाली. सुतार समाज सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास असल्याकारणाने समाजातील शिक्षणासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. कौटुंबिक परिस्थिती शिक्षणाला फारसी अनुकूल नसते. गरिबीमुळे हा समाज मुले - मुली हुशार असताना देखील शिकवू शकत नाहीत. अशी अवस्था असताना देखील सुतार समाजातून ज्यांना शिक्षणाची खूप आवड होती त्यांनी आर्थिक परिस्थितीशी संघर्ष करून व ज्यांची शिकण्याची ऐपत होती घरातील वातावरण अनुकूल होते अशा दोन्ही प्रकारच्या कुटुंबातून शिक्षण घेवून नवीन पिढी शिक्षक, पोलीस, डॉक्टर, वकील, इंजीनीयर, जिल्हाधिकारी, न्यायाधीश, शासकीय अधिकारी या सारख्या पदावर आरूढ होताना दिसत आहे. हा सर्वबदल सुतार समाजात शिक्षणामुळे झाला आहे. अनेक शिक्षित तरुणांनी पारंपारिक व्यवसाय सोडून विविध वेगळ्या कौशल्यावर आधारित व्यवसाय करण्याकडे आपला कल वळवला आहे. हा सर्व परिणाम सुतार समाजावर शिक्षणाचा झालेला दिसून येतो. शैक्षणिक विकासाच्या प्रवाहातआज सुतार समाज येत आहे. अर्थात यासाठी अनेक अडचणी येतात हि वस्तुस्थिती आहे. शिक्षणाच्या प्रवाहात असलेल्या समाजाचे प्रमाण पण अत्यल्प आहे. त्यामुळे सर्व समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची गरज आहे. यासाठी शासनाकडून व सामाजिक सेवाभावी संस्थाकडून गांभीर्याने विचारमंथन करण्याची गरज आहे. आजची सुतार समाजाची शैक्षणिक परिस्थिती पाहता समजाचा जो काही शैक्षणिक विकास आज झाला आहे त्या विकासाचा या समाजाच्या पारंपारिक व्यवसाय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर कोणता परिणाम झाला आहे हि बाब अभ्यासण्याची गरज संशोधक या नात्याने मला झाली त्यामुळे मी बहुसंख्य सुतार समाज असलेल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या पारंपारिक व्यवसाय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर झालेला परिणाम समोर येईल अशी संशोधकाला आशा वाटते.

### सुतार समाजाची पार्श्वभूमी:

सुतार समाजाची पारर्वभूमी खालीलप्रमाणे जाणून घेता येईल. या पारर्वभूमीतून सुतार समाजाची ओळख होण्यास मदत होईल. सुतार हा शब्द सुत्रधार या शब्दावरुन बनला अशी व्युत्पत्ती दिली जाते. ही व्युत्पत्ती ठीक वाटते. कारण लाकडावर काम करत असतांना सुत्राने (सुताने) मापे घेत खुणा कराव्या लागत असत. मग ओबडधोबड अशा लाकडापासुन कलाकृती जन्म घेत. भारतातील अनेक प्राचीन काष्टशिल्पे कलेचे अजोड नमुने मानले जातात.

### सुतार समाजाची अध्यात्मिकता:

कर्नाटकातील शिरसिंगी हे सुतार समाजाचे पवित्र ठिकाण मानले जाते व चैत्र अमावस्येला सर्व सुतार बांधव दर्शनासाठी जात असतात. आज सोशल मीडियाच्या माध्यमातून समाजाचे हे संस्कार सगळीकडे सारखेच पहावयास मिळतात. सातारा जिल्ह्यातील दिक्षित क्षीरसागर हे आडनावे पहायला मिळतात. तर कोल्हापूर भागात महामुनी वेदपाठक या आडनावाची समाज आहे. कर्नाटकात बडिगेर आडनाव असणारा समाज आहे बडिगेर म्हणजे कानडी सुतार.

### सुतार समाजाचे दैवत:

सुतार समाजाचे आराध्य दैवत भगवान प्रभू श्री विश्वकर्मा हे आहेत. भगवान विश्वकर्मा देवांचे वास्तुकला तज्ञ आहेत. त्यांनी भगवान श्रीकृष्णासाठी द्वारका,पांडवासाठी हस्तिनापूर व रावणासाठी सोन्याची लंका तयार केली. या नगरांच्या रचनेत, सौंदर्य, अचुकता व सुखसोयी यांचा मिलाप होता. ते वास्तुशास्त्राचे पहिले प्रणेते आहेत. देवता महापुरुष भगवान विश्वकर्मा यांचे मंदिर नाशिक त्र्यंबकेश्वर येथे आहे, येथे विश्वकर्मा जयंती साजरी केली जाते,येथे राहण्यासाठी सुतार समाज धर्मशाळा ट्रस्ट आहे, येथे

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

नारायण नागबळी,काळसर्प शांती करण्यासाठी जी लोकं येतात त्यांच्या राहण्याची येथे सोय केली जाते.संत निवृत्तीनाथांच्या समाधी मंदिराजवळ आहे धर्मशाळा. येथेच विश्वकर्मा मंदिर आहे, सुतार बांधव येथे एकत्र येऊन विश्वकर्मा जयंती साजरी करतात. सुतार समाजाची कुलदेवी श्री कालीका माता आहे,व तिचे मंदिर कनकशिळ, तालुका दौलताबाद, जिल्हा संभाजीनगर येथे आहे.

## वारकरी संप्रदाय व सुतार समाजातील संत मंडळी :

मराठा समाजात संत तुकाराम, माळी समाजात संत सावता माळी, धनगर समाजात संत बाळू मामा, न्हावी समाजात संत सेना महाराज, शिंपी समाजात संत नामदेव, बंजारा समाजात संत सेवालाल महाराज याप्रमाणेच सुतार समाजात सुद्धा संत भोजलिंग काका सुतार, जळोजी मळोजी हे वारकरी सुतार बंधू होवून गेले. सुतार समाज हा वारकरी संप्रदायाचा पाईक आहे. वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत जनाबाई यांच्या वैचारिक शिकवणूकीवर विश्वास ठेवून प्रपंच चालवणारा आहे. पंढरीचा पांडुरंग हे या समाजाचे श्रद्धास्थान आहे.

## निष्कर्षात्मक चर्चा:

संशोधकाला खालील कारणास्तव संशोधन महत्वाचे वाटते. प्रस्तुत शोधनिबंधातून सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा शोध घेतला गेला आहे. त्यामुळे यातून सुतार समाजाची शैक्षणिक परिस्थिती समोर येण्यास मदत होईल. सुतार समाजाच्या पारंपारिक व्यवसायाची स्थिती जाणून घेता येईल. सुतार समाजाच्या आर्थिक परिस्थितीची जाणीव इतर समाज घटक व शासनाला होईल. सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाचा त्यांच्या पारंपारिक व्यवसाय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती यावर झालेला परिणाम अभ्यासातून आला आहे. एकंदरीत वरील सर्व बाजूने सारासार विचार केला असता समाजाचा एक अविभाज्य घटक म्हणून सहअस्तित्वात असलेल्या सुतार समाजाला संपूर्ण समाजाच्या विकासाच्या प्रवाहासोबत घेवून जाणे गरजेचे आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाने त्यांच्या पारंपारिक व्यवसायात सकारात्मक बदल घडवले आहेत. - सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६) शिक्षणाने सुतार समाजाला पारंपरिक कामांशिवाय इतर रोजगाराचे मार्ग खुले झाले, ज्यामुळे त्यांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारली आहे. - सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६) पूर्वी सुतार समाज फक्त लाकडी वस्तू बनवण्यावर अवलंबून होता. शिक्षणामुळे त्यांना आधुनिक तंत्रज्ञान आणि कौशल्ये प्राप्त झाली, ज्यामुळे त्यांनी लाकडी वस्तूंव्यतिरिक्त इतर व्यवसाय देखील सुरू केले. - सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६) शिक्षणाने सुतार समाजाला चांगले रोजगाराचे मार्ग उपलब्ध केले. काहीजण सरकारी नोकऱ्यांमध्ये तर काहीजण खासगी कंपन्यांमध्ये काम करू लागले. - सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६) शिक्षणामुळे सुतार समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास मदत झाली. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढला आणि त्यांनी सामाजिक समस्यांवर आवाज उठवला. - सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजाचा पारंपारिक व्यवसाय संपुष्टात आला आहे. - सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६) काही सुतार कुटुंबांनी शिक्षणानंतर बांधकाम व्यवसाय, फर्निचर डिझाइन किंवा अन्य संबंधित क्षेत्रात स्वतःचा व्यवसाय सुरू केला आहे -.सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६) काही सुतार शिक्षणानंतर सरकारी नोकऱ्यांमध्ये काम करतात, ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे- . सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६) शिक्षणामुळे सुतार समाजातील महिलासुद्धा आता शिक्षण घेत आहेत आणि विविध क्षेत्रात काम करत आहेत, ज्यामुळे त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मोठा बदल झाला आहे. -सांगूळे संदीपान दत्तात्रय,

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६) शिक्षणामुळे सुतार समाजातील लोकांच्या उत्पन्नात वाढ झाली आहे .शिक्षणामुळे सुतार समाजातील लोकांना विविध क्षेत्रांमध्ये रोजगार मिळण्यास मदत झाली आहे -.सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६) सुतार समाजाच्या शैक्षणिक विकासाने त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवले आहेत. शिक्षणामुळे त्यांच्या पारंपारिक व्यवसायात सुधारणा झाली आहे, त्यांच्या सामाजिक स्थितीमध्ये सुधारणा झाली आहे आणि त्यांची आर्थिक स्थितीही सुधारली आहे. हे बदल त्यांच्या जीवनात एक नवीन दिशा आणि संधी निर्माण करत आहेत -.सांगूळे संदीपान दत्तात्रय, पीएच.डी., अर्थशास्त्र विभाग, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड. (२०१६)

## शिफारशी :

सुतार समाज सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. त्यांच्या सामाजिक विकासासाठी आणि आर्थिक प्रगतीसाठी विविध योजना आणि उपायांची गरज आहे.

सुतार समाज आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेला आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड कार्यक्षेत्रातील सुतार समाजातील अनेक लोक लाकडी वस्तू बनवतात, जसे की दरवाजे, फर्निचर, इत्यादी.

सुतार समाजातील लोकांना आर्थिक अडचणी येतात, विशेषतः पारंपरिक व्यवसाय बदलत्या स्थितीत किंवा पारंपारिक व्यवसाय संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे.

सुतार समाजातील लोकांना शिक्षण आणि कौशल्य विकास कार्यक्रम उपलब्ध करणे, जेणेकरून ते आधुनिक व्यवसायात सहभागी होऊ शकतील.

सुतार समाजाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सरकार विविध योजना राबवते, त्या योजनांचा लाभ घेणे आवश्यक आहे.

विविध सुतार समाजातील लोकांना एकत्र आणून सामाजिक समस्यांवर काम करणे, ज्यामुळे समाजाला सक्षम करता येईल.

शिक्षणामुळे सुतार समाजातील लोकांनी नवीन व्यवसाय सुरू केले आहेत, ज्यामुळे त्यांची आर्थिक सुरक्षितता वाढली आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची :

गुरव,अनुराधा, (१९९७ ). शालेय कृतीसंशोधन. मेहता, पब्लिकेशन हाउस, : पुणे, ३०.
उपसाणी, ना.के., (१९७२). शैक्षणिक कृतीसंशोधन. म.रा.पा.नि.व अभ्यास मंडळ, :पुणे.
मुळे आणि उमाटे, (१९८७). शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे. म.वि.ग्रंथ निर्मिती मंडळ, : नागपुर.
डॉ. आगलावे, प्रदीप, (२००७).सामाजिक संशोधन पध्दती. विद्या प्रकाशन, :औरंगाबाद.
डॉ. मंगरूळकर, मीना, आवडे, कमलादेवी, डॉ. कट्टी, (२००७). भारतीय समाज आणि प्राथमिक शिक्षण. फडके प्रकाशन, : कोल्हापूर.
डॉ. नागतोडे, किरण, (२००७). भारतीय शिक्षण पध्दतीचा विकास. विद्या प्रकाशन, :नागपूर.
अहेर, हि.रा., (१९९५). उदयन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक. विद्या प्रकाशन, :नागपूर.
पाटील, लि. ला., (१९७४). आजचे शिक्षण आजच्या समस्या. श्री विद्या प्रकाशन, :पुणे.
डॉ. जगताप, ह.ना., (१९९२). शिक्षणातील नव विचारप्रवाह व नवप्रवर्तने. नुतन प्रकाशन, :पुणे.
डॉ. आगलावे, प्रदिप, (२००७). भारतीय समाजव्यवस्था व मुल्ये. विद्या प्रकाशन, :नागपुर.
डॉ.दुनाखे, अरविंद, (१९८३). उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण. डायमंड पब्लिकेशन, :पुणे.
पाटील, लीला. (१९८३). आजचे अध्यापन. सुयोग प्रकाशन, :पुणे.
बापट, भा.गो. (१९९५). शैक्षणिक संशोधन. नूतन प्रकाशन, : पुणे.
भिंताडे, वि.रा. (१९८९). शैक्षणिक संशोधन पद्धती. नूतन प्रकाशन, :पुणे.